# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०२५

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**बुधवार, दिनांक २६ मार्च, २०२५ / चैत्र ५, १९४७ (शके)**

**(१) मुख्यमंत्री**
**(२) पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री**
**(३) इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धव्यवसाय विकास, अपारंपारिक ऊर्जा मंत्री**
**(४) पर्यटन, खनिकर्म, माजी सैनिक कल्याण मंत्री**
**(५) माहिती तंत्रज्ञान, सांस्कृतिक कार्ये मंत्री**
**(६) परिवहन मंत्री**

**} यांचे प्रभारी विभाग** (applies to items (२)–(५))

---

**प्रश्नांची एकूण संख्या - २४**

---

### महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित व अराजपत्रित संयुक्त पूर्व परिक्षांबाबत

**(१) * २३२ डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित संयुक्त पूर्व परीक्षा २०२५ तसेच महाराष्ट्र अराजपत्रित गट ब व गट क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२४ साठी वयोमर्यादा ओलांडलेल्या विद्यार्थ्यांना नव्याने परिक्षेला बसण्यासाठी संधी देण्याच्या मागणीला मा.मुख्यमंत्री महोदयांनी अनुकूलता दर्शविली असून, राज्याच्या मुख्य सचिवांना याबाबत लक्ष घालून पाठपुरावा करण्याचे निर्देश दिले असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०२०-२१ च्या कोरोना कालावधीत स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना सन २०२३ पर्यंत कमाल वयोमर्यादेत शिथिलता देण्याचा निर्णय घेतला होता, त्याप्रमाणे या विद्यार्थ्यांना महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परिक्षेच्या वयोमर्यादेत वाढ करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने महाराष्ट्र अराजपत्रित गट ब व गट क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२४ साठी वयोमर्यादा ओलांडलेल्या विद्यार्थ्यांना नव्याने परिक्षेला बसण्याची संधी देण्याकरीता कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे अंशत: खरे आहे

(२) व (३) शासनाच्या दिनांक २०/१२/२०२४ च्या शासन निर्णयाव्दारे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत दिनांक १/०१/२०२४ ते दिनांक २०/१२/२०२४ पर्यंत पदभरतीकरीता ज्या जाहिराती नव्याने प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत आणि त्या जाहिरातींच्या निवड प्रक्रियेचा कोणताही टप्पा पार पडलेला नाही अशा जाहिरातींकरीता अर्ज केलेल्या उमेदवारांना परिक्षेला बसण्याची संधी उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने एक वेळची विशेष बाब म्हणून कमाल वयोमर्यादेत १ वर्षाची शिथिलता देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आंबिवली (जि.ठाणे) येथील इराणी वस्तीमधील गुंडांविरूध्द कारवाई करण्याबाबत

**(२) * १२११ श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आंबिवली (जि.ठाणे) येथील इराणी वस्तीमध्ये गुंडाला पकडण्यासाठी गेलेल्या पोलीस पथकावर गुंडांकडून हल्ला करण्यात आला असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापूर्वी अनेकवेळा या वस्तीमधून पोलिसांवर हल्ला झाल्याच्या घटना घडल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, इराणी वस्तीमध्ये अनेक गुंडांना आश्रय दिला जात असल्यामुळे ठाणे जिल्ह्यामध्ये सदर वस्तीची दहशत निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर वस्तीतील गुंडांच्या विरुध्द शोध मोहिम राबवून कठोर कारवाई करण्यासाठी एक विशेष पथक निर्माण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

खडकपाडा पोलीस ठाणे, ठाणे शहर येथे दिनांक ०५/१२/२०२४ रोजी गु.र.क्र.८५३/२०२४ भारतीय न्यायसंहिता, २०२३ मधील कलम १०९(१), १२१(१), १३२, १८९(३), १८९(५), २६२, २६३, ३(५), ३५१(१), ३५२ गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयात ११ आरोपी व इतर अनोळखी महिला व पुरुष यांचा समावेश असून मा.न्यायालयात दोषारोप सादर करण्यात आले असून सदर प्रकरण मा.न्यायालयात प्रलंबित आहे.

(२) व (३) इराणी वस्तीमधून पोलीसांवर हल्ले झाल्याच्या अनुषंगाने खडकपाडा पोलीस ठाणे, ठाणे शहर येथे गु. र. क्र.२८७/२०१८, गु. र. क्र.२५८/२०१९, गु. र. क्र.४२/२०२१, गु. र. क्र.३९३/२०२२, गु. र. क्र.५०१/२०२३ हे गुन्हे दाखल आहेत. वरील सर्व गुन्हे मा.न्यायालयात प्रलंबित आहेत.

(४) इराणी वस्तीतील गुन्हेगारांविरुध्द कोंबिंग ऑपरेशन व ऑल आऊट ऑपरेशन राबविण्यात येत आहे. तसेच गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी व अंमलदार दररोज रेकॉर्डवरील गुन्हेगारांचा शोध घेत आहेत. इराणी वस्तीतील गुन्हेगारांविरुध्द मोक्का अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. पोलीस पथकास मदत

पुरवून बाहेरील राज्यातुन अथवा जिल्ह्यातुन आलेल्या गुन्हेगारांना पकडून संबंधित पोलीस पथकाचे ताब्यात देण्यात येते. तसेच इराणी गुंड प्रवृत्तीविरूध्द प्रतिबंधक कारवाई करून नियमितपणे त्यांच्या हालचालींवर निगराणी ठेवण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जांभे परिसरातील (पिंपरी चिंचवड) आरएमसी प्लांटमुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आल्याबाबत

**(३) * १३४९ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी चिंचवड, हिंजवडी आयटी पार्क (पुणे) येथील जांभे परिसरात आरएमसी प्लांटमुळे सर्वत्र धुळ पसरल्याने तेथील स्थानिक नागरिकांना श्वसनाचे आजार तसेच अपघातांना सामोरे जावे लागत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्लांटमुळे आयटी पार्क परिसरात सतत वाहतूक सुरू असल्याने या परिसरातील रस्त्यांची दुरवस्था झाली असून त्यामुळे सर्वसामान्यांना धुळीचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पिंपरी चिंचवड, हिंजवडी आयटी पार्क येथील जांभे परिसरातील आरएमसी प्लांटमधून हवेत पसरणारी धूळ कमी करून नागरिकांचे आरोग्य सुधारण्यासाठी तसेच त्यांना सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे अंशत: खरे आहे.तथापि, जांभे परीसरातील आरएमसी प्लांटबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही. वैद्यकीय अधिकारी, आरोग्य विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांच्या दिनांक ०८/०३/२०२५ रोजीच्या प्राप्त अहवालानुसार हवा प्रदूषणाबाबत कोणतीही लेखी तक्रार प्राप्त नाही. जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांच्या दिनांक १०/०३/२०२५ रोजीच्या प्राप्त अहवालानुसार श्वसनाचे विकार असलेले रुग्ण आढळून आले नाहीत. उप-प्रादेशिक परिवहन अधिकारी, प्रादेशिक परिवहन कार्यालय, पिंपरी चिंचवड, पुणे यांच्या दिनांक १०/०३/२०२५ रोजीच्या प्राप्त अहवालानुसार हिंजवडी परिसरात आयटी पार्क असल्याने त्या भागात वाहनांची वर्दळ मोठ्या प्रमाणात आहे. तसेच त्या परिसरात मोठ्या इमारतींचे बांधकाम व मेट्रोचे कामकाज चालू आहे.

(२) हे खरे नाही. जांभे परिसरातील आरएमसी प्लांटस मधुन आयटी पार्क परिसरात वाहतूक होत नाही. तथापि, अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, पुणे-१ यांच्या दिनांक १२/०३/२०२५ रोजीच्या प्राप्त अहवालानुसार विभागाच्या अखत्यारीतील पिरंगूट, घोटावडे, माण, हिंजवडी, मारुंजी, कासारसाई रस्ता राज्य मार्ग क्र.१३० हा हिंजवडी आयटी पार्क मधून जात असून सदरील रस्ता वाहतूकीस सुस्थितीत आहेत व जांभे परिसरात सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीतील कोणताही रस्ता नाही.

(३) राष्ट्रीय स्वच्छ हवा कार्यक्रम (NCAP) अंतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस सन २०२० ते २०२६ या कालावधीकरीता रुपये १७२.९७कोटी इतका निधी मंजूर झाला असून आतापर्यंत रुपये ८८.५४ कोटी इतका निधी प्राप्त झालेला आहे. या अंतर्गत २ मोबाईल रोड वॉशर व ५ मुव्हेबल फॉग कॅनॉन डस्ट सप्रेशन सिस्टम असलेली वाहने महानगरपालिका हद्दीत कार्यान्वित करण्यात आलेली आहेत. हवा गुणवत्ता निर्देशांक (AQI) सुधारण्यासाठी ६ ठिकाणी Air Purification system व १३ ठिकाणी Automizer /Dry Mist Fountain बसविण्यात आलेले असून कार्यरत आहेत. प्रादेशिक परिवहन कार्यालय पिंपरी चिंचवड तसेच पोलीस वाहतूक विभागामार्फत या परिसरात वाहतूकीच्या नियमांचे उल्लंघन करुन वाहन चालविणाऱ्या वाहनधारकांवर दंडात्मक कारवाई केली जाते.
(४) प्रश्नच उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई व उपनगर परिसरातील बेकायदेशीर इलेक्ट्रीक दुचाकी वाहनांवर कारवाई करण्याबाबत

**(४) * १४७२ श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य परिवहन विभागाच्या सन १९८८ च्या मोटर वाहन कायद्यांतर्गत कोणतेही वाहन चालविण्यासाठी परवानगी घेऊन मोटार वाहनावर नंबर प्लेट लावणे, विमा काढणे, वाहनचालकांचा परवाना असणे, प्रदूषण पातळी मर्यादित असणे इ. बाबी बंधनकारक आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वजनाने कमी व २५ कि.मी. ताशी वेगाच्या वाहनांना या कायदेशीर बाबी लागू नसून स्वीगी, झोमॅटो सारख्या फुड डिलिवरी करणाऱ्या कंपन्या ताशी वेग ५० ते ६० कि.मी. पेक्षा अधिक व बॅटरी पॉवर ५०० वॅट पेक्षा जास्त असलेल्या बेकायदेशीर वाहनांचा वापर करित असल्याने सदर कंपन्या मोटर वाहन कायद्याचे उल्लंघन करित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बंगळूर शहरामध्ये झिप सारख्या नियमबाह्य वाहनांवर दंडात्मक कारवाई केली असून मागील काही वर्षांपासून मुंबई व उपनगर परिसरात चीनी बनावटीच्या बेकायदेशीर इलेक्ट्रीक वाहने जसे बोल्ट-अप, तिरंगा, ग्रीन बोल्ट, स्कूटर यांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, गीग क्षेत्रात काम करणाऱ्या डिलिवरी बॉयला कोणतीच सुरक्षा पुरविली जात नाही याबाबत अध्यक्ष, आदिवासी क्षेत्र आढावा समिती यांनी दिनांक २६ जून, २०२४ रोजी वा त्यासुमारास गृह विभागास निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास मुंबई शहर व उपनगरांत बेकायदेशीर इलेक्ट्रीक वाहने धावत असल्याने त्याबाबत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने शासनामार्फत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक :** (१) होय.
(२) व (३) अंशतः खरे आहे.
(४) श्री.विवेक पंडीत यांचे दिनांक २६/०६/२०२४ रोजीचे पत्र आढळून येत नाही.
(५) प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (मध्य, पश्चिम, पूर्व), बोरीवली या कार्यालयाच्या वायुवेग पथकांमार्फत बेकायदेशीरपणे वेग मर्यादा व बॅटरी वॅट क्षमता यांच्यामध्ये बदल केलेल्या इलेक्ट्रीक

संवर्गातील दुचाकी वाहनांची नियमित तपासणी करण्यात येते. सदर तपासणीदरम्यान दोषी आढळलेल्या वाहनांवर मोटार वाहन कायद्यानुसार कारवाई करण्यात येते. इलेक्ट्रिक बाईक्समध्ये विनापरवाना बदल केलेली १६ इलेक्ट्रीक दुचाकी वाहने प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (पूर्व) यांना आणि १० इलेक्ट्रीक दुचाकी वाहने प्रादेशिक परिवहन कार्यालय, बोरीवली यांना तपासणीमध्ये आढळून आलेली आहेत.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शिरसोली (जि.जळगाव) येथील अल्पवयीन मुलीवरील अत्याचार प्रकरणी कारवाई करण्याबाबत

**(५) * १५८६ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिरसोली (जि.जळगाव) गावातील अल्पवयीन मुलीला पळवून नेत जबरदस्तीने मंदिरात लग्न करुन तिच्यावर अत्याचार करुन जीवे मारण्याची धमकी देण्यात आली असल्याची बाब दिनांक २८ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने संबंधित दोषीविरुध्द कारवाई करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशत: खरे आहे.

फिर्यादी हिचे गावातील ओळखीचा मित्र नितेश धनराज राठोड याने तिचे बालमनाचा फायदा घेऊन तिचेशी मैत्री करुन दिनांक १४/०१/२०२४ ते दिनांक २०/०१/२०२५ या कालावधीत तिच्या मनाविरुध्द शारीरिक संबंध करुन, तिचे एकटीचे तसेच त्याचे सोबतचे अश्लील फोटो व व्हिडीओ काढून ते व्हायरल करण्याची, तसेच फिर्यादी व तिच्या आई वडीलांना मारुन टाकण्याची धमकी देऊन तिला पळवून नेऊन तिच्या मनाविरुध्द वारंवार शारीरिक संबंध प्रस्थापित केले आहे.
(२) सदर प्रकरणी एमआयडीसी पोलीस स्टेशन, जळगाव येथे CCTNS No.५१/२०२५ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ६३(b), ६४(२)(m), १३७(२), ११८(१), ३५१(२), ३(५) सह बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण अधिनियम (पोक्सो), २०१२ कलम ६, १० अन्वये दिनांक २५/०१/२०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील ४ आरोपींपैकी एक आरोपी न्यायालयीन कोठडीत असून, तीन आरोपींना मा.न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## उंबरखेडा (ता.मंठा, जि.जालना) येथील रोहित्र वारंवार जळत असल्याने शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान होत असल्याबाबत

**(६) * १६८६ श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उंबरखेडा (ता.मंठा, जि.जालना) येथील रोहित्र वारंवार जळत असल्याने शेतकऱ्यांच्या शेतातील कापणीसाठी आलेल्या ज्वारी, हरभरा, गहू, हळद, मोसंबी, ऊस, केळी, बाजरी यांसह अनेक पिकांचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान होत असल्याचे तसेच महावितरण कंपनीचे अधिकारी व कर्मचारी याकडे दुर्लक्ष करीत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने उपरोक्त प्रकरणी चौकशी करुन शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान होऊ नये, यासाठी वारंवार जळत असलेले रोहित्र दुरुस्त करण्यासंदर्भात तसेच अखंडित वीज पुरवठा करुन शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान होवू नये यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही,

मौजे उंबरखेडा येथील कृषीपंपास वीज पुरवठा करणारे १०० के.व्ही. चे रोहित्र दिनांक १४/०१/२०२५ रोजी नादुरुस्त झाले होते. सदर नादुरुस्त रोहित्र दिनांक १६/०१/२०२५ रोजी बदलून कृषी पंपाचा वीज पुरवठा पूर्ववत करण्यात आला आहे. रब्बी हंगामातील वीजेची गरज व बहुतांशी शेतकरी विद्युतपंपास स्वयंचलित बटण (Auto Starter) वापरत असल्यामुळे एकाचवेळी रोहित्रावरील विद्युतभार वाढल्याने दिनांक २४/०१/२०२५ रोजी रोहित्र पुन्हा नादुरुस्त झाले होते. सदर नादुरुस्त रोहित्र दिनांक २५/०१/२०२५ रोजी बदलून वीज पुरवठा पूर्ववत करण्यात आला असून, रोहित्रांची अर्थिंग दुरुस्ती व देखभालीचे काम पूर्ण करण्यात आले आहे.

(२) जालना मंडळांतर्गत रोहित्र देखभाल व दुरुस्तीसाठी ५८ ठेकेदारांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांचेमार्फत रोहित्रांचे अर्थिंग करणे, वितरण पेटीचे दुरुस्ती करणे, ऑईल गळती रोखणे, नादुरुस्त रोहित्र ने -आण करणे व इतर दुरुस्तीची कामे करण्यात येतात.

नादुरुस्त रोहित्र तातडीने दुरुस्त करण्यासाठी महावितरण कंपनीमार्फत विभागनिहाय एजन्सी नियुक्त करण्यात आल्या आहेत. तसेच निरंतर वीज योजनेतंर्गत ग्राहकांना अखंडीत व दर्जेदार वीज पुरवठा देण्याकरीता १५ वर्षापेक्षा जास्त जुने विद्युत रोहित्र बदलविणे, रोहित्रांचे ऑईल बदलविणे इत्यादी कामे करण्यात येत आहेत. ऑईलचा मुबलक साठा उपलब्ध असून, रोहित्र दुरुस्ती किंवा कार्यान्वित असलेल्या रोहित्रांसाठी ऑईलची कमतरता भासणार नाही. तसेच नादुरुस्त रोहित्र वेळेत बदलण्याची दक्षता महावितरणमार्फत घेण्यात येते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## परिवहन विभागाने तीन कंपन्यांना उच्च सुरक्षा नोंदणी पाटी लावण्याचे कंत्राट दिल्याबाबत

**(७)** * **१७१३ श्री.पंकज भुजबळ :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्रीय मोटर वाहन नियम १९८९ च्या नियमानुसार सर्व वाहनांना "उच्च सुरक्षा नोंदणी पाटी" (High Security Number Plate) बसविणे बंधनकारक असून दिनांक १ एप्रिल, २०१९ रोजी नंतर वाहन विक्रेत्याकडून नोंदणी झालेल्या वाहनांना ही नंबर प्लेट बसविण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, देशातील इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रातील तीन कंपन्यांकडून नंबर प्लेट बदलण्यासाठी दुप्पट पैसे आकारले जात असून ही कोट्यवधींची लूट परिवहन विभागाच्या संगनमताने सुरु आहे, परिवहन विभागाने तीन कंपन्यांना वाढीव दराने उच्च सुरक्षा नोंदणी पाटी लावण्याचे कंत्राट दिल्यामुळे दुचाकी मालकांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागणार असल्याचे माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने दुचाकी मालकांचा आर्थिक भार कमी करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक :** (१) होय.

(२) व (३) दिनांक ०१/०४/२०१९ पुर्वी नोंदणी झालेल्या वाहनांवर उच्च सुरक्षा नोंदणी पाटी (एचएसआरपी) बसविण्याकरीता घटकांची निवड निविदा प्रक्रियेद्वारे करण्यात आली आहे. उच्च सुरक्षा नोंदणी पाटी (एचएसआरपी) बाबतचे महाराष्ट्र राज्यातील दर निश्चित करताना अन्य राज्यामधील दरांचा आधार घेण्यात आला आहे. दिनांक ०१/०४/२०१९ पुर्वी नोंदणी झालेल्या वाहनांना उच्च सुरक्षा नोंदणी पाटी (एचएसआरपी) बसविण्याबाबतचे महाराष्ट्र राज्यातील दर खालीलप्रमाणे आहेत:-

| अ.क्र. | वाहनाचा प्रकार | महाराष्ट्र राज्यातील एचएसआरपीचे दर (जीएसटी वगळून) |
|---|---|---|
| १. | दोन चाकी वाहने | रुपये ४५०.००/- |
| २. | तीन चाकी वाहने | रुपये ५००.००/- |
| ३. | चार चाकी वाहने | रुपये ७४५.००/- |
| ४. | जड वाहने | रुपये ७४५.००/- |

उच्च सुरक्षा नोंदणी पाटी (एचएसआरपी) बसविण्यासाठी निवड करण्यात आलेल्या ३ घटकांना परिवहन आयुक्त यांच्याकडून उद्देशिय पत्र (एलओआय) देण्यात आले असून सदर कंपन्यांसमवेत करार करण्यात आला आहे. तसेच याबाबतची मानक कार्यप्रणाली (एसओपी) देखील निर्गमित करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील वाहन चालकांच्या दंड रकमेमध्ये सवलत योजना लागू करण्याबाबत

**(८) * १८३६ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वाहतूक व्यवस्था सुरळीत होवून अपघातांचे प्रमाण कमी व्हावे याकरिता वाहतूक पोलिसांनी सन २०१९ पासून वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर सीसीटीव्ही आणि ई-पॉस मशीनच्या माध्यमातून ई-चलन सुरू केले असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाहतूक पोलिसांना देण्यात आलेल्या ई-चलन आणि ई-पॉस मशीनद्वारे आतापर्यंत ७ कोटी ५३ लाखांपेक्षा अधिक वाहन चालकांवर ३६६७ कोटी रुपयांचा दंड आकारण्यात आला आहे, त्यापैकी केवळ ३५% दंड वसुल करण्यात आला असून २४२९ कोटी रुपयांची वसूली अद्यापही बाकी आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर दंडाची रक्कम थकीत राहण्याची कारणे काय आहेत तसेच ई-चलनद्वारे दंडाच्या रकमेची वसुली होत नसल्यामुळे कर्नाटक राज्याप्रमाणे दंड रकमेमध्ये ५० टक्के सवलत देण्याची योजना राज्यात सुरु करण्याबाबत व थकीत असलेली दंडाची रक्कम वसूल करण्यासाठी कोणती कार्यवाही वा उपायोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

सन २०१९ ते माहे डिसेंबर, २०२४ अखेर मोटर वाहन नियमनाच्या उल्लंघनापोटी एकूण ९,९५,४५,७०६ एवढ्या ई-चलन केसेस दाखल करण्यात आल्या असून, सदर चलन दंडाची एकूण रक्कम रुपये ५८१६,६५,८४,५२२/- इतकी आहे. त्यापैकी ४,४१,३५,९३७ ई-चलन केसेसच्या दंडाची रक्कम रुपये २१५७,५५,८४,८७२/- इतकी रक्कम वसूल करण्यात आली आहे. तसेच उर्वरित ५,५४,०९,७६९ ई -चलन केसेसची दंडाची रक्कम रुपये ३६५९,१०,००,०५०/- इतकी दंडाची रक्कम वसूल होणे बाकी आहे.

(३) महाराष्ट्र विधि व न्याय सेवा प्राधिकरण यांच्या मार्फत जिल्हा स्तरावर दर तीन महिन्यांनी लोकअदालतीचे ई-चलन केसेस तडजोडीसाठी दाखल करण्यात येतात. सन २०१९ पासून ते आजपावेतो एकूण १२ लोक अदालतीचे माध्यमातून ९१,७७,९७६ ई-चलन केसेस मध्ये रुपये ५५४,१३,८९,९००/- इतकी दंड तडजोडीच्या स्वरुपात वसूल करण्यात आला आहे.

या व्यतिरिक्त कसुरदार वाहनचालकांकडून ई-चलन दंड रक्कमेचा जास्तीतजास्त भरणा होण्याच्या दृष्टीने पुढीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत:-

१) MahaTrafficApp व MumbaipoliceTraffic App अन्वये स्मरण करण्यात येते.

२) बाह्य सरकारी एजन्सी (कॉल सेंटर) द्वारे ई चलानचा भरणा करण्याकरीता स्मरण करण्यात येते.

३) पोलीस अधिकारी/अंमलदार यांच्याद्वारे वाहनचालकांना प्रलंबित दंड भरण्याकरीता प्रोत्साहित करण्यात येत आहे.

४) वसुलीसंदर्भात अपर पोलीस महासंचालक (वाहतूक), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केली आहे.

५) कसुरदार वाहनचालकावर दंड न भरल्यास खटला दाखल करण्यात येतो.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील नद्यांचे प्रदूषण रोखण्याकरीता उपाययोजना करण्याबाबत

**(९) * १९०९ श्री.श्रीकांत भारतीय, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील गोदावरी, चंद्रभागा, इंद्रायणी, कृष्णा यासारख्या नदयांच्या पाण्याचा वापर शेतीकरीता, पिण्याच्या पाण्याकरीता होत असून केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने प्रकाशित केलेल्या अहवालामध्ये राज्यातील ६०३ नद्यांपैकी ३११ नद्या प्रदूषित असून ५५ नद्यांमधील पाण्यामध्ये प्राणवायुचे प्रमाण कमी असल्याचे आढळून आले आहे तसेच सांगली व कोल्हापूर जिल्ह्यातील कृष्णा, वारणा आणि पंचगंगा या नद्यांमध्ये अनेक ठिकाणी शहरातील सांडपाणी, साखर कारखान्यांचे मळीमिश्रीत दूषित पाणी, रसायनयुक्त व प्रक्रिया न करता पाणी सोडले जात असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नद्यांमध्ये प्रक्रिया न करता सोडण्यात येणारे शहरातील व कारखान्यातील सांडपाणी, कचरा, नदीलगतच्या जमिनीमध्ये शेतीकरीता वापरण्यात येणारी किटकनाशके, रासायनिक खते, इत्यादीमुळे या नदयांचे नाल्यामध्ये रूपांतरण होत असून, पावसाळयात देखील पावसाच्या पाण्यामुळे नद्या प्रवाहीत होत नसल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रदूषित नदीतील लाखो मासे, मगरी, जलचर प्राणी यांना आपला जीव गमवावा लागत असून नदीकाठी दूषित पाण्याने अनेक साथीचे रोग पसरले आहेत, यासंदर्भात संबंधित महानगरपालिका, पाटबंधारे विभाग, प्रदूषण नियंत्रण विभाग व जिल्हा प्रशासन यांच्याकडून नदी प्रदूषित करणाऱ्यांवर कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शेरीनाल्याच्या सांडपाण्यावर प्रक्रियेसाठी सांगली महानगरपालिकेचा रूपये ९३.३५ कोटींचा प्रस्ताव मंत्रालयात मंजूरी करीता प्रलंबित असून विभागाकडून कोणतीही मंजूरी देण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर नद्यांमध्ये स्नान करणारे वारकरी व भक्तगण यांच्या आरोग्यास मोठ्या प्रमाणात धोका निर्माण होत असल्याने या नदयांमधील घाण, कचरा, शेवाळ, गाळ काढणे, नदीचे खोलीकरण करणे,तसेच राज्यातील नद्यांचे प्रदूषण कमी करण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

• केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने सन २०१८ व सन २०२२ मध्ये प्रसिध्द केलेल्या अहवालामध्ये राज्यातील अनुक्रमे ५३ व ५६ प्रदूषित नदी पट्ट्यांचा समावेश करण्यात आला होता.

• महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने माहे जानेवारी, २०२४ ते डिसेंबर, २०२४ दरम्यान केलेल्या सर्वेक्षणानुसार राज्यामध्ये ५६ प्रदूषित नदी पट्टे असल्याचे निदर्शनास आले आहे.

• केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने सन २०१८ व सन २०२२ मध्ये प्रसिध्द केलेल्या प्रदूषित नदी पट्ट्यांबाबतच्या अहवालानुसार तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने माहे जानेवारी ते डिसेंबर, २०२४ मध्ये राज्यातील प्रदूषित पट्ट्यांच्या केलेल्या सर्वेक्षणानुसार प्राथम्य क्र. १ व प्राथम्यता क्र. २ मध्ये प्रदूषित नदी पट्ट्यांची संख्या कमी झाल्याचे दिसून येते.

(३) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत औद्योगिक कारखान्यांना प्रक्रियाकृत व अप्रक्रियाकृत औद्योगिक सांडपाणी नदीमध्ये सोडण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे.

• औद्योगिक सांडपाण्यामुळे होणाऱ्या जलप्रदूषणाच्या अनुषंगाने दोषी आढळणाऱ्या संबंधित उद्योगांवर जल (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण) कायदा, १९७४ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत वेळोवेळी कारवाई करण्यात येते.

• राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या भांडवली खर्चातील २५ % तरतूद सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापनासाठी राखीव ठेऊन याच कारणासाठी वापरणे बंधनकारक करण्यात आले आहे.

• स्थानिक स्वराज्य संस्थांच्या हद्दीमधून निर्माण होणाऱ्या व विनाप्रक्रिया सोडण्यात येणाऱ्या घरगुती सांडपाण्यामुळे होणाऱ्या जलप्रदूषणाच्या अनुषंगाने संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांविरुध्द महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत जल (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण) कायदा, १९७४ मधील तरतुदीनुसार वेळोवेळी कारवाई करण्यात येते.

(४) सांगली महानगरपालिका हद्दीतील शेरीनाल्यामध्ये सोडण्यात येणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याकरीता सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा उभारण्यास्तव सांगली महानगरपालिकेकडून अमृत २.० योजनेंतर्गतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झालेला असून सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(५) जिल्हा आरोग्य अधिकारी, सोलापूर, सांगली, पुणे व जिल्हा आरोग्य अधिकारी, नाशिक यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार प्रदूषित पाण्यामुळे रोगाची साथ पसरल्याची बाब आढळून आलेली नाही.

• राज्यातील जल प्रदूषण नियंत्रणाच्या अनुषंगाने शासनामार्फत दिनांक १३/१२/२०१८ रोजी नदी पुनरुत्थान समिती गठीत करण्यात आली असून सदर समितीमार्फत ५३ प्रदूषित नद्यांचे कृती आराखडे तयार करुन केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळास सादर करण्यात आले आहेत. सदर कृती आराखड्यांच्या अंमलबजावणीचे काम शासनाच्या विविध विभागामार्फत करण्यात येत आहे.

• राज्यातील जल प्रदूषण कमी करण्याबाबत उपाययोजना सुचविणे व सनियंत्रण करणे याकरीता कार्यदल (Task Force) गठीत करण्याची घोषणा करण्यात आली असून याबाबतची कार्यवाही शासनस्तरावर सुरू आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात कोट्यवधी रुपयांची वीज गळती व वीज चोरी होत असल्याबाबत

**(१०) * २०४५ डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वीज वितरण करणाऱ्या महावितरणची दरवर्षी सुमारे १२ हजार कोटींहून अधिक किंमतीची वीज चोरी होत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विजेच्या खरेदी आणि विक्रीचे आकडे पाहता महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने सादर केलेल्या प्रस्तावामध्ये दर्शविलेल्या गळतीहून अधिक वीज चोरी व गळती होत आहे, तसेच वीज चोरी व गळतीमध्ये दिवसेंदिवस वाढ होत असून त्याचा भुर्दंड नियमीत वीज देयक भरणाऱ्या ग्राहकांना बसत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने उपरोक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने वीज गळती व वीज चोरी थांबविण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) अशा आशयाची बातमी दिनांक ०३ फेब्रुवारी, २०२५ रोजी साप्ताहिक " मुंबई वचननामा " मध्ये प्रकाशित झाली होती.
(२) व (३) आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये वीज गळती १७.९५% इतकी आहे. वीज गळती व वीज चोरी कमी करण्यासाठी महावितरण कार्यालयाकडून नियमितपणे विभागीय पथकामार्फत वीज पुरवठा कायमस्वरुपी खंडीत केलेल्या ग्राहकांच्या वीज संचाची तपासणी करणे, कमी युनिट वीज वापर असणाऱ्या वाणिज्य ग्राहक (०-५० युनिट) व औद्योगिक ग्राहक (०-१०० युनिट) यांच्या विद्युत संचाची तपासणी करुन विद्युत संचातील अनियमितता व वीज चोरीचे प्रकार शोधण्यासाठी तपासणी मोहिमा राबविण्यात येतात. ७३५ उच्च वीज गळती असणाऱ्या वीज वाहिन्यांवर वीज गळती कमी करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. महावितरणमार्फत परिमंडळ, मंडळ, विभाग, उप विभागीय आणि वाहिनी स्तरावर ऊर्जा लेखांकन करण्यात येते.

महावितरण कंपनीतर्फे ६३ भरारी पथके व संचलन व सुव्यवस्था विभाग वीज चोरी पकडण्यासाठी कार्यरत आहेत.

विद्युत अधिनियम २००३ मधील कलम १२६, १३५ व १३८ अन्वये वीज चोरी करणाऱ्या ग्राहकांवर नियमानुसार कारवाई करण्यात येते. तडजोड रक्कम भरणा प्राप्त न झालेल्या वीज चोरी प्रकरणांत रितसर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हे नोंदविण्यात येऊन पोलीस प्रशासनाव्दारे पुढील कारवाई करण्यात येते.

तसेच वीज चोरीची माहिती देणाऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी महावितरणच्या नियमानुसार बक्षिस देण्यात येते.

महाराष्ट्र राज्यात सुधारित वितरण क्षेत्र (RDSS) योजनेतर्गंत वीज हानी कमी करण्यासाठी व वीज चोरी रोखण्यासाठी महावितरण कंपनीमार्फत वाहिनी पृथ्थकरण, वाहिनी विभाजन,वाहिनी क्षमतावाढ,वीज चोरी प्रवण क्षेत्रात केबलचा वापर, उच्चदाब वितरण प्रणाली व उपकेंद्रांना कॅपेसिटर बसविणे ही कामे केली जातात.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्राच्या संच क्रमांक ९ मध्ये स्फोट झाल्याबाबत

**(११) * २०७० श्री.सुधाकर अडबाले, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देशातील सर्वात मोठ्या औष्णिक ऊर्जा केंद्रापैकी एक असलेल्या चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्रात दिनांक १३ जानेवारी, २०२५ रोजी मोठा स्फोट होऊन ५०० मेगावॅटच्या संच क्रमांक ९ मध्ये आग लागल्यामुळे संच बंद पडला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत कमालीची गुप्तता बाळगली गेली असून संच ९ मध्ये मोठा स्फोट झाल्याने वीज केंद्राच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये भिती पसरली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्रात दिनांक ११ जानेवारी, २०२५ रोजी संध्याकाळी १८:५५ वाजता संच क्र.९ च्या जनित्रामध्ये (Generator) तांत्रिक बिघाड निर्माण झाल्यामुळे सदर संच बंद झाला. त्यावेळी स्फोट होणे, आग लागणे असा प्रकार झालेला नाही.
(२) उपरोक्त घटनेबाबत कोणतीही गुप्तता ठेवण्यात आलेली नसून दिनांक ३०/०१/२०२५ रोजी प्रेस नोट माध्यमांना देण्यात आली आहे. या घटनेमुळे विद्युत केंद्रातील अधिकारी, कर्मचारी व परिसरात कुठल्याही प्रकारची भिती पसरलेली नाही.
(३) महानिर्मिती कंपनीद्वारे उपरोक्त घटना घडल्यानंतर खालील तीन समित्यांमार्फत तपासणी करण्यात आली.
१. प्राथमिक तपासणी- अधीक्षक अभियंता, चाचणी विभाग नागपूर
२.जनित्राची अंतर्गत तपासणी(Internal Inspection)- मे. एनटीपीसीचे (M/s. NTPC) माजी कार्यकारी संचालक श्री.बिमलेश कुमार सिंग
३.तांत्रिक बिघाडाच्या मूळ कारणाचे विश्लेषण करणे- मुख्यालय स्तरावर चार सदस्यीय समिति

उक्त समित्यांच्या निष्कर्षाप्रमाणे जनित्रामधील स्टेटर वॉटरच्या आकस्मिक घडलेल्या गळतीमुळे B-फेज अर्थ फॉल्ट उत्पन्न झाला, आणि परिणामत: जनित्र व त्याचेशी संबंधित यंत्रणा बंद झाली.

सदर तिन्ही समित्यांच्या निष्कर्षानुसार घटनेच्या मूळ-कारणाचे सखोल तांत्रिक विश्लेषण करण्यासाठी केंद्रीय विद्युत अनुसंधान संस्थान (CPRI), ऊर्जा मंत्रालय, भारत सरकार, बेंगळुरू या तज्ञ संस्थेशी संपर्क साधण्यात आला आहे.

सद्य:स्थितीत संचाच्या जनित्राच्या स्टेटरचे दुरुस्तीचे काम मे. बी.एच.इ.एल. (M/s. BHEL), यांचेमार्फत चंद्रपूर महा औष्णिक विद्युत केंद्र येथे सुरू आहे व जनित्राच्या रोटरच्या दुरुस्तीचे काम मे.बी.एच.इ. एल. (M/s. BHEL) यांच्या हरिद्वार येथील केंद्रात सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे वडवली (ता.वाडा, जि.पालघर) ग्रामपंचायत हद्दीतील प्रदूषण करणाऱ्या टायर कंपन्यांवर कारवाई करणेबाबत

**(१२) * २११७ श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे वडवली (ता.वाडा, जि.पालघर) ग्रामपंचायत हद्दीत असलेल्या ७ बेकायदा टायर कंपन्यांकडून दूषित पाणी थेट नाल्यात सोडण्यात येत असल्यामुळे येथील जमिनीच्या आतील पिण्याच्या पाण्याचा प्रवाह प्रदूषित होत असून या परिसरातील सुमारे दीड हजार ग्रामस्थांचे आरोग्य धोक्यात आले असल्याची बाब दिनांक १२ फेब्रुवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी मौजे वडवली (ता.वाडा, जि.पालघर) ग्रामपंचायत हद्दीत असलेल्या ७ प्रदूषणकारी टायर कंपन्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

• महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत करण्यात आलेल्या पाहणीदरम्यान वडवली येथील उद्योग त्यांचे औद्योगिक सांडपाणी नाल्यामध्ये सोडत असलेली बाब निदर्शनास आलेली नाही.

• जिल्हा आरोग्य अधिकारी, पालघर यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार वाडा तालुका अंतर्गत वडवली ग्रामपंचायत हद्दीतील टायर कंपन्या असलेल्या भागात केलेल्या सर्वेक्षणानुसार प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये येणाऱ्या रुग्ण संख्येच्या प्रमाणात वाढ आढळून आलेली नाही.

• तसेच वडवली ग्रामपंचायत हद्दीतील सार्वजनिक पिण्याचे पाणी स्त्रोतांचे पाणी नमुने जैविक व रासायनिक तपासणी केली असता पाणी पिण्यास योग्य असल्याबाबत जिल्हा आरोग्य अधिकारी, पालघर यांनी कळविले आहे.

(२) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत केंद्रीय निरिक्षण प्रणालीनुसार व प्राप्त तक्रारींनुसार उद्योगांची वेळोवेळी पाहणी करण्यात येते. पाहणी दरम्यान संमतीपत्रातील अटी व शर्तींचे उल्लंघन केल्याचे आढळून आल्यास महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत संबंधित उद्योगांवर नियमाप्रमाणे कारवाई करण्यात येते.

• वडवली परिसरातील टाकाऊ टायर पासून तेल बनविणाऱ्या उद्योगांनी संमतीपत्रातील अटी व शर्तींचे उल्लंघन केल्याचे आढळून आल्याने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत एकूण पाच उद्योगांना उत्पादन बंदचे आदेश देण्यात आले आहेत व दोन उद्योगांना प्रस्तावित निर्देश बजावण्यात आलेले आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोस्टल रोडवर रात्रीच्या वेळी कर्णकर्कश आवाजातील हॉर्न वाजविणाऱ्या वाहनांवर कारवाई करण्याबाबत

**(१३)** * **२१२८ श्री.मिलिंद नार्वेकर, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथे रात्रीच्या वेळी चालविण्यात येणाऱ्या रेसिंग कार व इतर वाहनांचे कर्णकर्कश आवाज व हॉर्नमुळे कोस्टल रोडलगतच्या वरळी, नेपीयन सी रोड, ब्रीचकँडी परिसरातील रहिवाशी तसेच तेथील रुग्णालयातील रुग्णांना वाहनांच्या आवाजाचा त्रास होत असल्याची बाब दिनांक ४ फेब्रुवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू मार्गावर ध्वनिप्रदूषण करणाऱ्या वाहनांवर कारवाई करण्याची मागणी स्थानिक रहिवाशांनी सह आयुक्त, वाहतूक पोलिस, मुंबई यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आणि कोस्टल रोडवर रात्रीच्या वेळी कर्णकर्कश आवाजातील हॉर्न वाजविणाऱ्या वाहनांवर कठोर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे खरे आहे.
रेसिंग कार व इतर वाहनांचे कर्णकर्कश आवाजातील हॉर्नमुळे कोस्टल रोडलगतच्या वरळी, नेपीयन सी रोड, ब्रीचकॅंडी परिसरातील रहिवाशी तसेच रुग्णालयातील रुग्णांना वाहनांच्या आवाजाचा त्रास होत असल्याबाबतचा अर्ज ई-मेल द्वारे वाहतूक विभाग, मुंबई यांना प्राप्त झाला आहे.
(३) कोस्टल रोड हा रात्री २४.०० ते सकाळी ०७.०० या वेळी बंद असतो. कोस्टल रोडवर नेमून दिलेल्या वेगापेक्षा जास्त वेगाने जाणाऱ्या वाहनांवर कारवाई करण्याकरीता ३ इंटरसेप्टर वाहनांची नेमणूक कोस्टल रोड येथे करण्यात आलेली आहे. दिनांक १५/०२/२०२५ पासून दिनांक १२/०३/२०२५ पर्यंत एकूण ३८८३ वाहनांवर कारवाई करण्यात आलेली आहे. तसेच, शांतता क्षेत्र घोषित केलेल्या ठिकाणी “नो हॉन्किंग” तसेच “शांतता क्षेत्र” इत्यादी फलक बसविण्याकरीता बृहन्मुंबई, महानगरपालिका कार्यालयास कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई शहरात ॲड टु अर्न ॲडव्हर्टायजर्स इंडिया प्रा.लि. कंपनीने गुंतवणूकदारांची फसवणूक केल्याबाबत

**(१४) * २१३६ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई येथील ॲड टु अर्न ॲडव्हर्टायजर्स इंडिया प्रा.लि. (Add to Earn Advertisers India Pvt.Ltd) कंपनीची दिनांक २१ जून, २०११ रोजी स्थापना करण्यात आली असून, सदर कंपनीच्या माध्यमातून जाहिरातीमधून पैसे मिळतील असे अमिष दाखवून कंपनीचे महासंचालक यांनी सुमारे ६४५ गुंतवणूकदारांची १,२८,८४,०००/- रुपयांची फसवणूक केल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कंपनीविरुध्द गुंतवणूकदारांनी लोअर परेल, मुंबई येथे दिनांक १९ सप्टेंबर, २०१२ रोजी तक्रार दाखल केली असून सदर प्रकरण (एफ.आय.आर.नं. १८७/१२) तेथून आर्थिक गुन्हे शाखेच्या युनिट तीनकडे पुढील कार्यवाहीसाठी सोपविण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने दोषी असलेल्या संबंधितांविरुध्द कारवाई करण्याबाबत तसेच संचालकांची मालमत्ता ताब्यात घेवून गुंतवणूकदारांचे पैसे त्यांना परत करण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, अंशत: खरे आहे.

सदर कंपनीने www.add२earn.com, www.add२earn.biz, www.add२earn.asia या ०३ वेबसाईट तयार करून वेबसाईटवर कंपनीच्या वेगवेगळया गुंतवणुकीच्या योजना (स्किम) गुंतवणुकदारांना दाखविल्या. प्लॅनप्रमाणे गुंतवणुक केल्यास गुंतवणुकदारांस आय.डी. मिळत असे. त्याप्रमाणे गुंतवणुकदाराने आठवड्यातुन १ वेळेला आय.डी.वर जावून कंपनीच्या वेबसाईटवर जाहीराती पाहिल्यास त्यांना रिवॉर्ड पॉइंट देण्यात येत असे. सदर रिवॉर्ड पॉइंटवर प्रत्येक महीन्याला गुंतवणुक केल्यास रकमेवर पुढील २० महिन्यापर्यंत परतावा मिळेल असे आमिष दाखविण्यात आले. कंपनीने ७१४५ गुंतवणूकदारांची रुपये ५,२५,२३,४२४/- इतक्या रकमेची फसवणूक केली आहे. सदर बाब सप्टेंबर, २०१२ मध्ये निदर्शनास आली आहे.

(२) होय. अंशत: खरे आहे.

सदर कंपनीविरुध्द गुंतवणूकदारांनी ना.म.जोशी मार्ग पोलीस ठाणे, मुंबई येथे दिनांक १९ सप्टेंबर, २०१२ रोजी गु.र.क्र. १८७/१२ हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हा तद्नंतर आर्थिक गुन्हे विभाग, मुंबई येथे (गुन्हा नोंद क्रमांक८६/१२) वर्ग करण्यात आला. प्रथमतः सदर गुन्हयांचा तपास युनिट तीन कडे होता.नंतर तो पुढील तपासाकरीता युनिट ११ येथे वर्ग झाला. युनिट ११ हे युनिट ८ मध्ये विलीन करण्यात आले आहे.

(३) यातील आरोपी व आरोपी वित्तीय संस्थांच्या एकूण ०४ स्थावर मालमत्ता, ०२ मोटारकार व ११ बँक खाती संरक्षीत करण्यात आलेल्या असून त्याबाबत दिनांक २२/०६/२०१६ रोजी एमपीआयडी कायद्यान्वये महाराष्ट्र शासन राजपत्र भाग चार-ब अन्वये अधिसूचना प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर प्रकरणी तपासाअंती दिनांक २२/०३/२०१८ रोजी मा.विशेष सत्र न्यायालय (एमपीआयडी कोर्ट), कोर्ट रुपये नं. ७, सत्र न्यायालय, मुंबई येथे दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. त्याबाबतचा कोर्ट केस क्रमांक ०५/२०१८ असा असून नमुद गुन्हा न्यायप्रविष्ट आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नवी मुंबई (नेरूळ) येथील एक्स.पी.ओ. शिपिंग मॅनेजमेंट कंपनीने नोकरीचे आमिष दाखवून तरुणांची फसवणूक केल्याबाबत

**(१५) * २१८२ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई (नेरूळ) येथील एमआयडीसीमध्ये सुरू केलेल्या एक्स.पी.ओ. शिपिंग मॅनेजमेंट या कंपनीने प्रत्येक तरुणाकडून ३ ते ५ लक्ष रुपये घेऊन त्यांना नेव्हीत नोकरीचे आमिष दाखवून दुबईला पाठवतो असे सांगून २० हून अधिक तरुणांची फसवणूक केल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी प्रत्येकी तरुणाकडून ३ ते ५ लक्ष रुपये घेऊन त्यांना दुबईला पाठविले, परंतु प्रत्यक्षात तिथे गेल्यावर त्यांना आपली फसवणूक झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे, चौकशीत काय आढळून आले व संबंधित व्यक्तींवर गुन्हा दाखल करून फसवणूक करणाऱ्या संबंधित कंपनीविरुध्द कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे अंशतः खरे आहे.

सदर प्रकरणात एकूण १० तरुणांकडून प्रत्येकी रुपये दोन लक्ष ते तीन लक्ष इतके रुपये घेऊन दुबई येथील बेसल-३ या शिपवर ए.बी.पदासाठी नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवून दुबईला पाठविण्यात आले होते. परंतु दुबई येथे गेल्यावर फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर सदर तरुणांनी आरोपीशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता प्रतिसाद न मिळाल्याने माहे, जानेवारी, २०२५ मध्ये पोलीस स्टेशन तुर्भे येथे तक्रारी दाखल करण्यात आल्या आहेत.
(३) नवी मुंबई (नेरूळ) येथील एमआयडीसीमधील एक्स.पी.ओ. शिपिंग मॅनेजमेंट या कंपनीने दुबई येथील बेसल-३ या जहाजावर ए-बी पदावर नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवून रुपये १,९८,७००/- इतक्या रकमेची फसवणूक केल्याप्रकरणी प्राप्त तक्रारीच्या आधारे सदर कंपनीविरोधात तुर्भे एमआयडीसी पोलीस ठाणे, नवी मुंबई येथे गु. र. क्र.९८/२०२५ भारतीय न्यायसंहिता, २०२३ मधील कलम ३१८ (४) अन्वये दिनांक २४/०२/२०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्याच्या तपासामध्ये एक्स.पी.ओ. शिपिंग मॅनेजमेंट या कंपनीने फिर्यादीव्यतिरीक्त अन्य ९ जणांना नोकरीचे आमिष दाखवून त्यांच्याकडून वेगवेगळया रकमा घेऊन फसवणूक केल्याचे पोलीस तपासामध्ये निष्पन्न झाले आहे. सदर गुन्ह्याच्या तपासामध्ये एकूण दोन आरोपी निष्पन्न झालेले असून त्यांचा शोध सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भंडारा जिल्ह्यात घरगुती वीज ग्राहक व प्रशासकीय कार्यालये यांच्या विद्युत देयकांच्या थकबाकीबाबत

**(१६) * १६६५ डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विक्रांत पाटील, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भंडारा जिल्ह्यात घरगुती वीजग्राहकांकडे ३ कोटी ५ लाख ७७ हजार रुपयांची थकबाकी असून जे ग्राहक मुदतीत देयक भरणा करणार नाहीत त्यांचा वीजपुरवठा खंडीत केला जात आहे तसेच भंडारा जिल्ह्यातील प्रशासकीय कार्यालयांकडे रूपये १९ कोटी ५६ लाखांहून अधिक थकबाकी असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रशासकीय कार्यालयाची थकीत रक्कम जास्त असून देखील संबंधित कार्यालयावर वीज खंडीत करण्याची कारवाई करण्यात येत नसल्याने नागरिकांमध्ये असंतोष निर्माण झाला असून, विदयुत देयकांच्या थकबाकीबाबत नागरिकांना एक न्याय आणि जिल्ह्यातील प्रशासकीय कार्यालयांना वेगळा न्याय देण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी प्रशासकीय कार्यालयाची थकीत असलेली वीज देयकाची रक्कम कार्यालयाने भरण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) अशा आशयाची बातमी दिनांक ०१ फेब्रुवारी, २०२५ रोजी दैनिक लोकमत मध्ये प्रकाशित झाली होती.
(२) व (३) भंडारा जिल्ह्यातील शासकीय कार्यालयांची सन २०२४-२५ या आर्थिक वर्षातील एकूण वीज बील थकबाकी रुपये ९.४१ कोटी असून, त्यापैकी महावितरणकडे रुपये ६.६२ कोटी वीज बील भरणा करण्यात आला आहे.

वित्त विभागामार्फत दिनांक ०१/१०/२०२४ च्या शासन निर्णयानुसार प्राप्त झालेल्या रुपये १५१.६२ कोटी निधीपैकी रुपये ३.२३ कोटी एवढी रक्कम भंडारा जिल्ह्यातील ग्रामपंचायतीच्या हद्दीतील पथदिवे वीज ग्राहकांमध्ये समायोजित करण्यात आले आहे. तसेच शासन निर्णय, दिनांक २०/०१/२०२५ रोजी प्राप्त झालेल्या रुपये २८४ कोटी निधीपैकी रुपये १.११ कोटी एवढी रक्कम भंडारा जिल्ह्यातील सार्वजनिक पाणीपुरवठा वीज ग्राहकांमध्ये समायोजित करण्यात आली आहे.

प्रशासकीय कार्यालयांना शासनाकडून अनुदान उपलब्ध होत असते व निधी उपलब्धतेनुसार वेळोवेळी वीज देयकाचा भरणा करण्यात येतो.

भंडारा जिल्ह्यातील प्रशासकीय कार्यालयांची थकबाकी भरण्यासाठी संबंधित कार्यालयांना नोटीस देऊन वीज पुरवठा खंडीत करण्यात येतो. तसेच ज्या प्रशासकीय कार्यालयांकडे वीज बीलांची थकबाकी आहे, अशा कार्यालयांना थकबाकी भरण्याच्या प्रत्यक्ष भेटून वेळोवेळी सूचना देण्यात येतात. तसेच नियमाप्रमाणे पाठपुरावा करण्यात येतो, दरमहा संगणकीय प्रणालीव्द्वारे वीज देयक भरण्याच्या सूचना देण्यात येत असतात.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील विशेषत: पुणे शहरातील हवेचे प्रदूषण कमी करण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(१७) * १३५३ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरातील वाहनांचे वाढते प्रमाण, इमारतींचे काँक्रिटीकरण, कार्बन उत्सर्जनाचे वाढणारे प्रमाण इत्यादी कारणांमुळे पुणे येथील हवा दिवसेंदिवस प्रदूषित होत असल्याची आकडेवारी केंद्रीय वने, पर्यावरण आणि जलवायू परिवर्तन मंत्रालयाच्या माजी सदस्यांनी व्यक्त केली असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुणे शहराप्रमाणेच मुंबई, नवी मुंबई, ठाणे,नागपूर, चंद्रपूर, छत्रपती संभाजीनगर आणि इतर शहरातील हवेचे प्रदूषण वाढत आहे, परिणामी तेथील बहुतांश नागरिकांना श्वसनाचे विकार उद्‌भवत असून रहिवाशांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील हवेचे प्रदूषण कमी करण्याच्या दृष्टीने पर्यावरणपूरक उपाययोजना करुन त्याबाबतची अंमलबजावणी करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

मागील ५ वर्षामधील पुणे शहराचा हवा गुणवत्ता निर्देशांक सन २०१९ मध्ये १११, २०२० मध्ये ७३, २०२१ मध्ये ६७, २०२२ मध्ये ९२, २०२३ मध्ये ९७ व २०२४ मध्ये ९२ इतका आहे.

तसेच, माहे जानेवारी, २०२५ मध्ये कर्वे रोड पुणे येथील हवा गुणवत्ता निर्देशांक येथे मध्यम (१०८), पुणे विद्यापीठ येथे समाधानकारक (९४), कात्रज डेअरी येथे मध्यम (१३८) असल्याचे आढळले.

(२) मुंबई शहरात पर्यावरण प्रदूषण संशोधन केंद्र केईएम रुग्णालयातर्फे केलेल्या Respiratory Morbidity Survey नुसार विविध लोकवस्त्यांत जाऊन केलेल्या सर्वेक्षणानुसार श्वसन विकाराच्या तक्रारी आढळून आल्या नाहीत.

पुणे, मुंबई, नवी मुंबई, ठाणे व चंद्रपूर महानगरपालिका, आरोग्य विभाग यांच्याकडून प्राप्त झालेल्या अहवालानुसार नागरिकांमध्ये आरोग्याबाबत तक्रारी प्राप्त न झाल्याचे नमूद आहे. तसेच, नागरिकांमध्ये आरोग्याच्या समस्या वाढत असल्याचे दिसून आले नाही.

(३) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिनांक २१/१२/२०२४ रोजी शहरी भागातील बांधकाम व कॉन्क्रिटीकरण करताना निर्माण होणाऱ्या हवेचे प्रदूषण कमी करण्याकरीता महानगरपालिका आयुक्त यांना निर्देश दिलेले आहेत.

तसेच, हरीत बांधकाम करणेकरीता टुलकिट प्रशिक्षण, बेकरी उद्योगांनी ०९/०७/२०२५ पर्यंत लाकूड व कोळसा हे इंधन म्हणून वापरणे बंद करून हरीत इंधनाचा वापर करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत व याबाबतची जाहीर सूचना स्थानिक वृत्तपत्रात दिनांक ०८/०२/२०२५ रोजी देण्यात आलेली आहे.

मुंबई महानगर क्षेत्रातील १९१ अतीप्रदूषणकारी उद्योगांचे प्रदूषण लेखा परीक्षण (Pollution Audit) केले आहे.

परिवहन आयुक्त यांना अवजड वाहनांमधुन उत्सर्जित होणाऱ्या प्रदूषकांची नियमित तपासणी करुन PUC जारी करण्याबाबतचे निर्देश देण्यात आलेले आहेत.

राष्ट्रीय शुध्द हवा प्रकल्पातंर्गत २०२४ पर्यंत PM२.५ व PM१० च्या प्रमाणात २०-३० % व २०२६ पर्यंत ४० % घट करणे निश्चित केले आहे. त्यानुसार चंद्रपुर - रुपये ६.९९ कोटी इतक्या निधी पैकी रुपये ६.७४ कोटी इतका निधी खर्च करण्यात आला आहे. तसेच १५ वा वित्त आयोगाअंतर्गत पुणे शहरास रुपये १६२.८६ कोटी पैकी रुपये १२८.३९ कोटी, मुंबई शहरास रुपये ६२०.१२ कोटी पैकी रुपये ५१३.२२ कोटी, नवी मुंबई - रुपये ५८.७५ कोटी पैकी रुपये ४४.१९ कोटी, ठाणे-रुपये ९३.२४ कोटी पैकी रुपये ७८.११ कोटी, नागपूर-रुपये १२९.८४ कोटी पैकी रुपये ५५.०८ कोटी व छत्रपती संभाजी नगर-रुपये ६६.९१ कोटी पैकी रुपये ५३.११ कोटी इतका निधी मंजूर करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील वीज ग्राहकांसाठी अभय योजना जाहीर केल्याबाबत

**(१८) * १४७६ श्री.प्रसाद लाड, श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **अपारंपारिक ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ६५,४४५ वीज देयकांच्या थकबाकीमुळे वीजेची जोडणी कायम स्वरुपी तोडलेल्या घरगुती, व्यावसायिक आणि औद्योगिक वीज ग्राहकांसाठी महावितरणने माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान अभय योजना जाहीर केली असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, थकबाकीदार ग्राहकांनी सुमारे ८६ कोटी रुपयांचा भरणा केला असून त्यांचे ४४ कोटी ३५ लाख रुपयांचे व्याज व विलंब आकार माफ होण्याकरीता अभय योजनेत मूळ देयकाच्या ३० टक्के रक्कम भरुन उर्वरित ७० टक्के रक्कम सहा हप्त्यात भरावयाची सवलत दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, घरगुती, व्यावसायिक व लघुदाब ग्राहक एक रकमी थकित देयक भरणा करित असल्यास त्यांना १० टक्के, उच्चदाब औद्योगिक व व्यावसायिक ग्राहकांना पाच टक्के सवलत जाहीर केली असून ग्राहकांच्या मागणीनुसार अभय योजनेला एक महिना मुदतवाढ देण्याचा निर्णय महावितरणने घेतलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या योजनेची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१), (२) व (३) हे अंशत: खरे आहे,

कायमस्वरुपी वीज पुरवठा खंडीत असलेल्या उच्चदाब व लघुदाब ग्राहकांच्या (कृषी आणि सार्वजनिक पाणीपुरवठा ग्राहक वगळून) थकबाकी वसुली करीता महावितरण अभय योजना-२०२४ ही योजना सुरु केली असून, सदर योजनेचा कालावधी दिनांक ०१ सप्टेंबर, २०२४ ते ३० नोव्हेंबर, २०२४ होता.सदर कालावधी ३१ मार्च, २०२५ पर्यंत वाढविण्यात आला आहे.

ग्राहकांना थकबाकीची देय रक्कम १००% एक रक्कमी भरण्याचा किंवा किमान ३०% डाऊन पेमेंटसह जास्तीत जास्त ०६ हप्त्यासह भरण्याचा पर्याय उपलब्ध आहे.

उच्चदाब ग्राहकांनी मूळ थकबाकी एक रक्कमी भरणा केल्यास त्यावर ५% अतिरिक्त सवलत मिळते. तसेच लघुदाब ग्राहकांनी मूळ थकबाकी एक रक्कमी भरणा केल्यास त्यावर १०% अतिरिक्त सवलत मिळते.

(४) सदर योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी समाजमाध्यमे, वर्तमानपत्र, स्थानिक केबल टी.व्ही., होर्डिंग्स तसेच FM रेडीओव्दारे राज्य पातळीवर या योजनेची व्यापक प्रसिध्दी करण्यात आली आहे. तसेच कायमस्वरुपी वीज पुरवठा खंडीत झालेल्या ग्राहकांना क्षेत्रिय कार्यालयामार्फत नोटीस आणि अभय योजनेची माहिती देण्यात आली आहे. या व्यतिरिक्त राज्य परिवहन मंडळाच्या १००० बस गाड्यांवर देखील या योजनेची जाहिरात करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नाशिक व जळगाव जिल्ह्यातील औष्णिक वीज निर्मिती प्रकल्पातील निविदा प्रक्रियेची चौकशी करणेबाबत

**(१९)** * **१५९१ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक औष्णिक वीज निर्मिती प्रकल्पातील निविदा प्रक्रियेत फेरबदल करून मर्जीतील ठेकेदारांना काम देण्याचा प्रयत्न करण्यात आल्याने सदर प्रकरणी चौकशी करण्यासाठी मा.विधानपरिषद सदस्यांनी दिनांक २४ जानेवारी, २०२५ व २५ जानेवारी, २०२५ रोजी मा.मुख्यमंत्री (ऊर्जामंत्री), व्यवस्थापकीय संचालक, अप्पर मुख्य सचिव, मुख्य सचिव यांचेकडे पत्रव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने नाशिक व जळगाव जिल्यातील औष्णिक वीज निर्मिती प्रकल्पाच्या निविदेत गैरव्यवहार केल्याप्रकरणी शासनाने संबंधितांविरुध्द कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) नाशिक औष्णिक विद्युत केंद्रातील निविदेच्या चौकशी संदर्भात मा.विधानपरिषद सदस्य यांचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांना अग्रेषित दिनांक २४ जानेवारी, २०२५ रोजीचे पत्र महानिर्मिती कंपनीस प्राप्त झाले आहे.

मात्र दिनांक २५/०१/२०२५ रोजीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांना अग्रेषित असलेले पत्र नाशिकबाबत नसून भुसावळ औष्णिक विद्युत केंद्रासंदर्भात आहे. सदर पत्र जळगाव जिल्ह्यातील भुसावळ औष्णिक वीज केंद्रास परस्पर ई-मेल द्वारे प्राप्त झाले आहे.
(२) मा.विधानपरिषद सदस्य यांच्या उपरोक्त दोन्ही पत्रातील मुद्द्यांच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली आहे. याप्रकरणी औष्णिक विद्यूत केंद्रनिहाय तपशील पुढीलप्रमाणे आहे.
• नाशिक औष्णिक विद्युत केंद्र :
१) मा.सदस्यांच्या दिनांक २४/०१/२०२५ रोजीच्या पत्रात नमूद नाशिक औष्णिक वीज केंद्र येथील निविदा क्र. RFx. ३००००५२४८२ ही “Work Of Deploying Dust Collection System And Recycling Of Airborne Dust For Vibrating Screen at CHP-II,” या कामासाठी प्रकाशित करण्यात आली होती. सदर निविदा Rfx. ३००००५२४८२ ही दिनांक ०८/११/२०२४ रोजी उघडण्यात आली होती. तद्नंतर तांत्रिक छाननी पश्चात पुरेशी स्पर्धा नसल्याने, सदर निविदा पात्रता निकष कायम ठेवून पुनः प्रकाशित करण्यात आली.

प्रस्तुत पुनःप्रकाशित निविदा ही दिनांक २८/०३/२०२५ पर्यंत खुली असून या निविदेच्या प्रक्रियेत इच्छुक, पात्र निविदाधारक अजूनही सहभागी होऊ शकतात.
२) सबब, कोणा मर्जीतील ठेकेदारासच काम देणे असा प्रकार घडलेला नाही. तद्वत, संबंधित निविदेत कुठलाही गैरव्यवहार झालेला दिसत नाही.
•भुसावळ औष्णिक विद्युत केंद्र :
१) मा.वि. प. सदस्यांनी दिनांक २५/०१/२०२५ रोजीच्या पत्रामध्ये उल्लेख केलेल्या भुसावळ औ. वि. केंद्र येथील RFx. क्र. ३००००५२४१९ ही निविदा “AMC For Operation & amp; Maintenance Of Feeder Ejector System, Fly Ash Evacuation System, Bottom Ash, Coarse Ash, Slurry

Pump, Ash Disposal Lines, Silos And HCSD Pump System At AHP-६६०MW At BTPS, Deepnagar" या कामासाठी प्रकाशित करण्यात आली होती. सदर निविदा Rfx. ३०००० ५४३१४ ही दिनांक ०८/११/२०२४ रोजी उघडण्यात आली होती.

२) सदर निविदा प्रक्रिया चालू असतानाच्या कालावधीत भुसावळ ६६० मेगावॅट, राख हाताळणी विभागाच्या (AHP) संचलन व देखभालीशी संबंधित काही महत्वाची तांत्रिक कामे नव्याने सामोरी आली. ही तांत्रिकदृष्ट्या निकडीची व महत्वाची कामे समाविष्ट न केल्यास भविष्यात AHP चे संचलन व देखभालीबाबत उद्भवू शकणारे परिणाम व त्यासंबंधीची सुरक्षितता लक्षात घेऊन; अधिकच्या तांत्रिक कामांचा समावेश करून पात्रता निकष न बदलता सदर निविदा पुनःप्रकाशित करण्यात आली.

३) पुनःप्रकाशित निविदेची प्रक्रिया पार पडल्यानंतर अंदाजित मूल्याच्या (Estimated Cost) २०.९% कमी दराने न्यूनतम बोली प्राप्त होवून कार्यादेश देण्यात आला.

४) संबंधित निविदेत कुठलाही गैरव्यवहार झालेला नाही.

मा.सदस्यांच्या पत्रांमध्ये उल्लेखित खुल्या निविदांची प्रक्रिया पारदर्शक पध्दतीने, ई-टेंडर प्रणालीद्वारे, महानिर्मितीच्या निविदा धोरणाच्या अटी व शर्तींच्या अधीन राहून, तसेच महानिर्मितीचे हित लक्षात घेऊन योग्य त्या पध्दतीने पार पाडण्यात आलेल्या आहेत. यात कुठल्याही प्रकारे गैरव्यवहार झालेला नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## परभणी येथील तरुणाचा पोलिसांच्या मारहाणीत मृत्यू झाल्याबाबत

**(२०) * १९१२ श्री.पंकज भुजबळ :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी येथे झालेल्या दगडफेक प्रकरणामध्ये अटक केलेल्या सोमनाथ सूर्यवंशी या तरुणाचा पोलिसांच्या मारहाणीमध्ये मृत्यू झाला असल्याची बाब दिनांक १५ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने संबंधितांवर कारवाई करण्याच्यादृष्टीने तसेच पिडीत कुटुंबियांना शासनामार्फत अर्थसहाय्य देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) परभणी येथे झालेल्या दगडफेक प्रकरणामध्ये अटक केलेल्या सोमनाथ सूर्यवंशी या तरुणाचा दिनांक १५ डिसेंबर, २०२४ रोजी मृत्यू झाला आहे. सदर मयताच्या मृत्यूबाबतचे अंतिम निष्कर्ष अहवाल अद्याप अप्राप्त आहे. त्यामुळे, सद्य:स्थितीत सोमनाथ सूर्यवंशी या तरुणाचा पोलिसांच्या मारहाणीमध्येच मृत्यू झाला असल्याचे निश्चितपणे सांगता येत नाही. सदर प्रकरणाची चौकशी सुरू आहे.

(२) याप्रकरणी, मयत सोमनाथ सुर्यवंशी याच्या न्यायालयीन कोठडीतील मृत्यूची दंडाधिकारीय चौकशी मा.प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, परभणी यांनी केली आहे. त्यांनी त्यांचा चौकशी अहवाल पोलीस अधीक्षक, परभणी यांचेकडे सादर केला आहे. सदर अहवाल पुढील कार्यवाहीसाठी राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, परभणी यांचेकडे देण्याची कार्यवाही सुरू आहे. तसेच, सदर प्रकरणाची न्यायालयीन चौकशी

माननीय न्यायमुर्ती श्री.व्हि. एल. आचलिया, निवृत्त न्यायाधीश मा.उच्च न्यायालय, मुंबई हे करीत आहेत.

आंदोलकांवर वाजवीपेक्षा जास्त बळाचा वापर केल्याच्या आरोपावरुन १ पोलीस निरीक्षक, १ पोलीस उप निरीक्षक व ३ पोलीस अंमलदार यांना निलंबित करण्यात आले आहे.

पिडीत कुंटुबियांना अर्थसहाय्य करणे संबंधाने जिल्हाधिकारी कार्यालय, परभणीमार्फत मयत सोमनाथ सुर्यवंशी याच्या कुटुंबाला रुपये १० लाख मदत देण्यात आली होती. परंतु, कुटुंबियांनी ती नाकारली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राजुरा व कोरपना (जि.चंद्रपूर) येथील अंबुजा सिमेंट कंपनीकडून उभारण्यात येत असलेल्या लाईमस्टोन माईन प्रकल्पाबाबत

**(२१) * १६७० डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजुरा, गडचांदूर व कोरपना (जि.चंद्रपूर) येथील अंबुजा सिमेंट कंपनीच्या प्रदूषणामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असूनही त्याकडे दुर्लक्ष करुन पुन्हा अंबुजा सिमेंट कंपनी राजुरा, कोरपना (जि.चंद्रपूर) येथे प्रस्तावित लाईम स्टोन माईन प्रकल्प उभारणार असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राजुरा व कोरपना तालुक्यांमध्ये मानवी वस्त्या, वन्य प्राणी, जलप्राणी व पक्षांचा अधिवास असल्याने या प्रकल्पामुळे दोन्ही तालुक्यांतील जवळपास २० पेक्षा अधिक गावांना प्रदुषणाचा धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने अंबुजा सिमेंट कंपनीच्या प्रस्तावित प्रकल्पासाठी दिनांक ३ फेब्रुवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास आयोजित जनसुनावणी रद्द करावी अशी मागणी नागरिकांनी केली असून अंबुजा सिमेंट कंपनीच्या प्रस्तावित माईन प्रकल्पास स्थगिती देऊन सदर प्रकल्प इतरत्र उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) अंशत: खरे आहे. जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांचेकडून दिनांक ०५/०३/२०२५ रोजीच्या प्राप्त अहवालानूसार गेल्या दोन वर्षात रूग्णांच्या संख्येत वाढ किंवा घट झाल्याचे दिसून येत नाही. तथापि, मे. अंबुजा सिमेंट लि. यांच्या प्रस्तावित मराठा लाईमस्टोन माईन-II, लखमापूर, ता.कोरपना, जि.चंद्रपूर या उद्योगाने त्यांच्या चुनखडी खाणीच्या विस्तारीकरण प्रकल्पाकरीता केंद्र शासनाकडे पर्यावरण विषयक अनुमतीसाठी अर्ज सादर केला आहे.

(२) सहाय्यक आयुक्त, मत्स्य व्यवसाय (तांत्रिक), चंद्रपूर यांचेकडून दिनांक ०६/०३/२०२५ रोजीच्या प्राप्त अहवालानुसार जिल्ह्यात जलचर प्राण्यावर विपरित परिणाम होऊन नुकसान होत असल्याबाबत कोणतीही तक्रार अथवा निवेदन प्राप्त झालेले नाही. मुख्य वन संरक्षक, वन विभाग, चंद्रपूर यांचेकडून दिनांक ०७/०३/२०२५ रोजीच्या प्राप्त अहवालानुसार अंबुजा सिमेंट कंपनीचा प्रस्थावित लाईम स्टोन माईन प्रकल्प हा टेलीमेंट्री कॉरिडॉरमध्ये येत असल्याने प्रकल्प यंत्रणेने वन विभागाकडे सादर केलेला वन्यजीव

मंजुरीबाबतचा प्रस्ताव, त्रुटी पुर्ततेकरीता प्रकल्प यंत्रणेकडे प्रलंबित आहे. सद्य:स्थितीत चालू असलेल्या चुनखडी खाणीच्या प्रकल्पामध्ये संमतीपत्रातील अटीनुसार जल तथा वायू प्रदूषण नियंत्रणाकरीता आवश्यक संयंत्रणा बसविण्यात आल्या आहेत.

(३) मे. अंबुजा सिमेंट लि. यांच्या प्रस्तावित मराठा लाईमस्टोन माईन-II, लखमापूर, ता.कोरपना, जि.चंद्रपूर विस्तारीकरण प्रकल्पाची पर्यावरण विषयक जनसुनावणी दिनांक ०३/०२/२०२५ रोजी अपर जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली आहे. जनसुनावणीदरम्यान नागरिकांनी नोंदविलेल्या हरकती, सूचना व आक्षेप यांची नोंद घेण्यात आली असून जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्याकडे सादर केले आहे. तसेच, जनसुनावणी दरम्यान सदर जनसुनावणी रद्द करण्यात यावी, असे निवेदन प्राप्त झालेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर जिल्ह्यात राईस मिल मधील दूषित पाणी मोकळ्या जागेत सोडले जात असल्याबाबत

**(२२) * १७७३ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्ह्यात राईस मिल मधील दूषित पाणी मोकळ्या जागेवर सोडले जात असून सदर उद्योगाकरिता बॉयलर मध्ये कोळशाऐवजी धानाच्या कोंड्याचा वापर केल्यामुळे हवेच्या प्रदूषणात मोठ्या प्रमाणात वाढ होत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राईस मिलच्या दूषित पाण्यामुळे जमिनीचा पोत घसरून पिकांच्या उत्पादनात घट तसेच वायू प्रदूषण होत असल्याने शेत पिकांचे नुकसान होत असल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नागपूर जिल्ह्यातील राईस मिलची पाहणी करून राईस मिलमुळे शेत जमिनीमध्ये होणारे जल प्रदूषण तसेच हवेमध्ये होणारे वायू प्रदूषण रोखण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे अंशत: खरे आहे.

मे. सोना ॲग्रोटेक, जि.नागपूर या उद्योगामधून होणाऱ्या जल व वायु प्रदूषणाबाबतची तक्रार माहे जानेवारी, २०२५ मध्ये जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर यांच्याकडे प्राप्त झाली होती.

(२) प्रश्नाधीन विषयास अनुसरून मे. सोना ॲग्रोटेक या उद्योगाबाबतची तक्रार तालुका कृषी अधिकारी, रामटेक यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाली होती. सदर तक्रारीच्या अनुषंगाने तालुका कृषी अधिकारी, रामटेक यांचेमार्फत करण्यात आलेल्या पाहणीदरम्यान कंपनीमुळे होणाऱ्या प्रदूषणामुळे शेत पीकांचे काही प्रमाणात नुकसान होत असल्याचे आढळून आले होते. त्यानुषंगाने तालुका कृषी अधिकारी, रामटेक यांचेमार्फत कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) मे. सोना ॲग्रोटेक, जि.नागपूर या उद्योगामुळे होणाऱ्या प्रदूषणाबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे दिनांक २४/१२/२०२३ व दिनांक ३१/०१/२०२४ रोजी तक्रारी प्राप्त झाल्या होत्या.

• सदर तक्रारीच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत सदर उद्योगास दिनांक १७/०५/२०२४ रोजी प्रस्तावित निर्देश देण्यात आले होते.

• सदर तक्रारींच्या अनुषंगाने केलेल्या पाहणीदरम्यान मे. सोना ॲग्रोटेक, जि.नागपूर या उद्योगाने दिनांक १७/०५/२०२४ रोजी दिलेल्या प्रस्तावित निर्देशांचे अनुपालन केले नसल्याचे निदर्शनास आले होते. त्यामुळे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत सदर उद्योगास दिनांक २१/०१/२०२५ रोजी उत्पादन बंद करण्याचे निर्देश देण्यात आले होते.

• मे. सोना ॲग्रोटेक, जि.नागपूर या उद्योगाने प्रदूषणिनयंत्रण यंत्रणेत सुधारणा केल्याने सदर उद्योगामार्फत उत्पादन पुन: सुरु करण्यास महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत दिनांक ०६/०२/२०२५ रोजी मान्यता देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जळगाव जिल्ह्यातील औष्णिक वीज निर्मिती प्रकल्पाचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(२३) * १५९२ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिपनगर, भुसावळ (जि.जळगाव) येथील औष्णिक वीज निर्मिती प्रकल्पांतर्गत भेल कंपनीने १x ६६० प्रकल्पातील कंत्राटाची अनेक कामे निकृष्ट दर्जाची केली असून, महाजनकोचे अधिकाऱ्यांनी त्या कामांमध्ये अनियमितता व गैरव्यवहार केला असून रेन वॉटर हार्वेस्टर, पाईपलाईनची कामे अपूर्ण व निकृष्ट दर्जाची केली असल्याने सदर कामांची चौकशी करण्यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ५ ऑगस्ट, २०२४ रोजी प्रधान सचिव, ऊर्जा विभाग यांचेकडे निवेदन सादर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिपनगर औष्णिक वीज निर्मितीच्या सदर प्रकल्पातील EIA EC प्रमाणे पर्यावरणीय कायद्याचे उल्लंघन तसेच केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल विभागाच्या परवानगीचे उल्लंघन करून पाणी उपसा करित असल्याची बाब दिनांक ११ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, BTPS १x६६० प्रकल्पअंतर्गत Wagan Tiplar Complex चे भेल कंपनीने निकृष्ट दर्जाचे केलेले काम सुधारण्याकरिता महाजनकोने निविदा काढून अंदाजे दोन कोटी रुपयांचा गैरव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने ६६० MW प्रकल्पातील अपूर्ण कामांबाबत व पाईपलाईनमध्ये केलेल्या निकृष्ट दर्जाच्या कामाबाबत तसेच केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल विभागाच्या कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) भुसावळ (जि.जळगाव) येथील औष्णिक वीज निर्मिती ६६० MW प्रकल्पातील पर्यावरणीय अपूर्ण कामे व पाईप लाईनच्या निकृष्ट कामाबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी श्री.एकनाथरावजी खडसे, विधानपरिषद सदस्य, यांचे प्रधान सचिव (ऊर्जा) यांना अग्रेषित दिनांक ५/०८/२०२४ रोजीचे निवेदन प्राप्त झाले आहे.

महानिर्मिती कंपनीद्वारे भुसावळ (जि.जळगाव) येथील औष्णिक वीज निर्मिती प्रकल्पातील कामाची गुणवता तपासण्याकरीता मे. डीसीपीएल कंपनी या त्रयस्थ कंपनीची सल्लागार म्हणून नेमणूक केली आहे. तसेच महानिर्मितीच्याही गुणवत्ता मंडळ अधिकाऱ्यांच्यामार्फत गुणवता तपासणी करून देयके अदा करण्यात आली आहेत. सदर प्रकल्प यशस्वीरिता कार्यान्वित झालेला आहे.

सदर प्रकल्पातील एकूण ६ हार्वेस्टिंग पाँड पैकी ४ ची कामे पूर्ण झाली असून उर्वरित २ रेन वॉटर हार्वेस्टिंग पाँडची कामे हाती घेण्यात आली आहेत.

राखेच्या पाईपलाईनचे काम झाल्यानंतर त्याची गुणवता मानकानुसार हायड्रोलिक टेस्ट करून घेण्यात आली.

प्रकल्पाच्या चाचणी दरम्यान सदर राख पाइप लाईनद्वारे वेल्हाळा राख बंधाऱ्यांमध्ये यशस्वीरित्या निस्सारित करण्यात आलेली आहे. त्यात कोणत्याही प्रकारची गळती झालेली नाही.

(२) हे खरे नाही.

महानिर्मितीच्या तांत्रिक सल्लागार मे. डीसीपीएल यांच्या सल्ल्यानुसार व्हॅगन टिपलर टनेल लिकेज थांबविण्यासाठी ११ जानेवारी, २०२५ रोजी कंत्राटदार मे. भेलच्या रिस्क व कॉस्ट वर काम करण्यासाठी निविदा प्रकाशित करण्यात आली. त्यामध्ये पाणी उपसा करण्याचे काम हे तांत्रिक दृष्ट्या तात्पुरत्या स्वरूपाचे असून उपसा केलेल्या पाण्याचा वापर प्रकल्पाच्या कामात करण्यात येणार नाही.

(३) भुसावळ (जि.जळगाव) येथील औष्णिक वीज निर्मिती प्रकल्पातील १x६६०मे.वॅ प्रकल्पाच्या कंत्राट करारानुसार प्रकल्प कार्यान्वित करून देण्याची सर्वस्वी जबाबदारी मे. भेल कंपनीची आहे.

व्हॅगन टिपलर टनेल लिकेज थांबविण्यासाठी संबंधित कामाची निविदा महानिर्मिती कंपनीतर्फे मे. भेल यांच्या जोखमीवर करणे प्रस्तावित आहे. यासाठी लागणारा खर्च पूर्णतः कंत्राटदार मे. भेल यांच्या बिलातून कपात करण्यात येईल. त्यामुळे यात कोणताही गैरव्यवहार झालेला नाही.

(४) पर्यावरण विभागाच्या मंजूरीनुसार Effluent Treatment Plant (ETP), Sewage Treatment Plant (STP) ची कामे झालेली असून रेन वॉटर हार्वेस्टिंग, ग्रीन बेल्टची कामे लवकरच पूर्ण होतील.

राख पाईप लाईनची संपूर्ण कामे, गुणवत्ता चाचणी त्रयस्थ सल्लागाराच्या देखरेखीखाली निर्धारीत गुणवत्तेच्या मानांकनानुसार पूर्ण केली आहेत. प्रकल्पाच्या चाचणी दरम्यान पाईप लाईनद्वारे राख, वेल्हाळा राख बंधाऱ्यामध्ये यशस्वीरीत्या निस्सारीत करण्यात आली आहे. प्रकल्प कार्यान्वित झाल्यापासून उत्तमपणे कार्यरत आहे व त्यातून कोणतीही गळती झालेली नाही.

(५) विलंब झालेला नाही.

-----------------

## टाकळी (ता.जि.लातूर) येथील युवकाच्या हत्येप्रकरणी आरोपींना अटक न केल्याबाबत

**(२४)** * **१९१६ श्री.पंकज भुजबळ :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) टाकळी (ता.जि.लातूर) येथील युवकाला दिनांक २७ ऑक्टोबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास बेदम मारहाण केल्यामुळे गंभीर जखमी होवून या युवकाचा दिनांक ६ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास बेशुध्द अवस्थेत मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी हत्याकांडातील उर्वरित आरोपींना अटक न करणे आणि या गुन्ह्यामध्ये निष्काळजीपणा करणाऱ्या पोलिसांविरुध्द कारवाई करण्याच्या मागणीसाठी दिनांक ५ फेब्रुवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास सकल ओबीसी बहुजन संघटना, लातूर यांनी पोलीस अधीक्षक, लातूर यांचेकडे तक्रार केली आहे तसेच या प्रकरणी माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये लातूर येथे आंदोलने करण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने टाकळी येथील युवकाचा मारहाणी दरम्यान मृत्यू झाल्याप्रकरणी संबंधित आरोपीवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

सदर तक्रारीतील निष्काळजीपणा करणाऱ्या पोलिसांविरुध्द कारवाई करण्याच्या अनुषंगाने उपविभागीय पोलीस अधिकारी, लातूर शहर यांच्यामार्फत चौकशी करण्यात येत आहे.

(३) माऊली सोट खून प्रकरणी एम. आय. डी. सी. पोलीस ठाणे, लातूर येथे दिनांक ०१ नोव्हेंबर, २०२४ रोजी गु.र.क्र. ७५५/२०२४, भा.न्या.सं. कलम १०३(१), १०९, ३३३, ३५२, ३५१(२), १८९(२), १९१(२), १९१(३), १९० अन्वये एकूण आठ आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील सर्व आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांना न्यायालयीन कोठडी मंजूर झाली असून गुन्ह्याचा पुढील तपास सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (१)(कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.